# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

# संवाद

Price ₹ 3/-

VOL : 9

ISSUE : 4

OCTOBER : 2016

ऑक्टोबर : २०१६

PAGES : 24


मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादाशी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥



OCTOBER 2016 SAMVAD

## *Snapshots of the Annual General Meeting held at Pune on 22nd August 2016*



Shri. S. B. Gokhale, Circle President lighting the auspicious lamp



Shri. Sudhir Pawar, Circle Jt. Secretary welcoming the members



Shri. Ashok Pandit, Secretary, Pune Z.S.C. welcoming Shri. S. B. Gokhale, Circle President



Shri. Vilas Gandhe, Circle Secretary, addressing the Gathering



A section of the audience



Shri. Prabhakar Gupchup, Editor, 'Samvad' informing about 'Samvad' Competition Awards

# संपादकीय ✍

प्रिय सभासदमित्रांनो,

दिवाळीनिमित्त रोचक, रंजक व रुचिपूर्ण साहित्यिक फराळ घेऊन 'संवाद'चा हा 'दीपावली विशेषांक' आपल्या सेवेस सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद नि अभिमान वाटत आहे. 'संवाद'चा हा अंक आपल्या दिवाळीच्या आनंदात निश्चितच भर घालील असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच आपण 'संवाद' चे स्वागत मनापासून कराल यात काय शंका?

दीपावली हा दिव्यांचा सण. दीप म्हणजे दिवा. दिवा हा प्रकाशाचा दूत किंवा वाहक. अशा दिव्यांच्या रांगा किंवा समूह एकत्र आल्यावर अंधाराचा नाश व्हायला कितीसा वेळ लागेल? प्रकाशाचे असंख्य दीप घेऊन येणाऱ्या दीपावलीचं म्हणूनच आपण हर्षोल्हासपूर्वक स्वागत करतो. आपल्या जीवनात अनेक मार्गांनी येणाऱ्या अंधकाररूपी नानाविध संकटांचं - अरिष्टांचं निराकरण व्हावं आणि आपलं जीवन प्रकाशरूपी सुख-समाधान व समृद्धीने भरून जावं ही सदिच्छा मनात धरून आपण दिवाळीचं स्वागत करूया. दिवाळीचा सण हा सर्व सणांचा राजा किंवा दिवाळी ही सर्व सणांची जणू सम्राज्ञीच होय अशी आपली अढळ श्रद्धा असते.

एका प्रतिभाशाली पण अज्ञात कवीने शब्दरूप दिलेल्या काव्यपंक्तींची आम्हाला येथे प्रकर्षाने आठवण होत आहे. ''मुखामध्ये आली ओवी। मनामध्ये पहाटले। काळोखाच्या फांदीवर प्रकाशाचे पक्षी आले।'' ... अर्थात मुखावाटे येणाऱ्या ओवीत मनामध्ये पहाट आणण्याचं अलौकिक सामर्थ्य असतं तसंच अज्ञानरूपी काळोखाच्या फांदीवर ज्ञानरूपी प्रकाशाचे पक्षी आल्यास सारा आसमंत प्रकाशून जातो, उजळून जातो. वास्तविक उगवणारा प्रत्येक दिवस वा पहाट रात्रीच्या काळोखाचा-अंधाराचा नाश करीतच जन्माला येतात. रात्रीच्या गर्भात म्हणजेच घनदाट अंधारातच दिवसाचा प्रकाश-उषःकाल दडलेला असतो. तो प्रगट होण्याची वेळ यावी लागते. प्रकाशाचे पक्षी काळोखाच्या फांदीवर यावे लागतात. रात्रीमागून दिवस आणि दिवसामागून रात्र हे चक्र सतत चालूच असते. दिवस-रात्रीचा, अंधार-प्रकाशाचा, सुख-दुःखाचा हा लपंडाव अव्याहतपणे चालूच असतो. 'उषःकाल होता-होता काळरात्र झाली' असं कवी म्हणत असला तरी उषःकाल व्हायचा थांबत नाही; फक्त त्यासाठी योग्य व अनुकूल वेळ यावी लागते. या वर्षीची दिवाळी लक्ष लक्ष दीपांच्या द्वारे आपल्या जीवनात सुख-समृद्धी-समाधान व आनंद घेऊन येणारी ठरो - अच्छे दिन आणणारी ठरो अशा दिवाळीनिमित्त आमच्या सर्वांना शुभेच्छा!

क्रांतिसेन रामचंद्र आठवले
मो. ९८६९९४१६९१

(We are publishing hereunder a letter sent by one of our members and our reply thereto for the information of our members)

***- Secretary***

**********************************

The Secretary, 'Samvad',

I am a retired SBI Employee, (P. F. No. 124486) retired through Exit Policy in December 2006.I am writing this letter to show my gratitude towards the advices offered by you through your magazine 'Samvad' regarding the Family Floater Group Health Insurance Policy of SBI.

I have undergone my Right Eye Cataract Operation on 25th July 2016 & have got the amount reimbursed within a month which happened to be of great help to me. I would like to thank you & your colleagues for the guidance which was provided in your magazine. The magazine has been providing us the needful information from time to time regarding the policy matters in systematic way. This Policy worked as a blessing for people like us who has retired through the Exit Policy.

May I get the information of the people who introduced this scheme & who took so much of efforts towards making this scheme more effective for us?. I would like to thank them for introducing such a useful scheme.

We would like if SBI provides us the detailed brochure containing all the detailed information of policy covers. It would be of great help if the information could be given in regional language for which the people like us who are not techno savvy and for subordinate staff who are unable to understand the scheme in detail.

Thanking you.

**Vrushali Vijay Patkar**, Goregaon (W)

Mob. No.- 9869012591

**********************************

Madam,

Thanks for your compliments and the suggestion. The discussions for the introduction of the FFGHI Scheme with the Corporate Centre were done by our President, Shri S. B. Gokhale, Mulund, (Mumbai), Shri B. G. Dandekar, (Thane), Adviser to the Associationand the office bearers of the Federation. Regarding your suggestion for compiling the information in a booklet (In English and Marathi), we advise that it has been engaging our attention since long but we will do it once the scheme is stabilized.

With regards.

***Vilas Gandhe***

Secretary, SBIPA, (Mumbai Circle), Pune.

*********************************************

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे
## नाशिक युनिट - वार्षिक मेळावा
### नोटीस

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन, नाशिक युनिटचा वार्षिक मेळावा **मंगळवार दि.२२ नोव्हेंबर २०१६ रोजी दु. ३.०० वाजता** खालील ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

'वैराज कलादालन', कुलकर्णी कॉलनी,
सोनी पैठणी जवळ, डॉ.लेले हॉस्पिटलच्या मागे,
शरणपूर रोड, नाशिक. (फोन नं.०२५३-२५८११७३)

कार्यक्रमाला सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.एस्. बी. गोखलेसाहेब, तसेच इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी श्री. शिंदे मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

**कार्यक्रम पत्रिका**

१) उपस्थितांचे स्वागत/ कार्यक्रमाच्या अध्यक्षांचे स्वागत व सत्कार
२) गतवर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहणे
३) नविन सभासदांचे स्वागत
४) उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन
५) युनिटच्या वार्षिक जमाखर्चास मंजूरी घेणे
६) आयत्या वेळीचे विषय
७) अध्यक्षीय समारोप
८) आभार प्रदर्शन

**भिमसिंग ठाकूर** — कमिटी मेंबर

**सोपान गडाख** — सेक्रेटरी

*******************************

## एका सेवाव्रती व्यक्तिमत्वाचा अस्त

## कै. श्री. केशव दत्तात्रय पराडकर

जन्म : १०/०८/१९२२ मृत्यू : २०/०९/२०१६

जून १९८७ मध्ये श्री. पराडकरांच्या घरी असोसिएशनची मिटींग होती. त्या मिटींगला मला कै. श्री. एस. एस. पंडित घेऊन गेले होते. तेथेच कै. पराडकरांची व माझी पहिली भेट झाली. त्यावेळी त्यांच्या व अन्य सेवानिवृत्तांच्या कामाचा झपाटा पाहिला. तो पर्यंत "Pensioners' Asson." चे नेमके काम काय हा मला प्रश्न पडला होता. एकदा पेन्शन मिळू लागल्यावर, पेन्शनरांना अशा काय मोठ्या अडचणी असू शकतात? पण याचे स्वरुप व कार्य याची माहिती मला कै. पराडकर व अन्य वरिष्ठांकडून कळली. कै. ल. ना. पाबळकर व कै. बापूसाहेब आफळे यांनी मला संघटनेने आधी केलेल्या कामाची माहिती दिली. त्यामुळे मीही याच कामात झोकून देण्याचे ठरविले.



एस.बी.आय. पेन्शनर्स असोसिएशन, (मुंबई सर्कल) पुणे १९९४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा. श्री. पराडकर, श्री. शेवरे, श्री. गद्रे

पराडकर यांचे शालेय शिक्षण प्रामुख्याने पुण्याला झाले. नोकरीची पहिली चार वर्षे त्यांची ''टेलिफोन व फील्ड कंट्रोल ऑफ मिलिटरी अकाउंटस्'' मध्ये गेली. ते १/१२/१९४५ ला इंपिरिअल बँकेच्या पुणे शाखेत कारकून म्हणून नोकरीस लागले. त्यानंतर औंध (सातारा), कराड, वेंगुर्ला, दौंड, टिळक रोड (पुणे), डेक्कन जिमखाना (पुणे), राहुरी, इत्यादी ठिकाणी निरनिराळ्या पदांवर काम करून ते १/२/१९८१ ला शाखाधिकारी म्हणून संगमनेर येथून निवृत्त झाले. लगेचच ते आपल्या संघटनेचे सभासद झाले. १९८२ व १९८३ मध्ये सहचिटणीस व १९८५ ते १९८७ मध्ये चिटणीस म्हणून पदभार त्यांनी यशस्वीपणे सांभाळला. त्यानंतर मृत्यूपर्यंत ते मानद सभासद होते.

कै. पराडकर हे मृदुस्वभावाचे व सदैव निवृत्तांच्या हिताचाच विचार करणारे होते. शेवटपर्यंत त्यांची स्मरणशक्ती व्यवस्थित होती. दि. १२/०९/२०१६ ला सर्वश्री रबडे व प्रभुदेसाई त्यांच्या भेटीला गेले होते. त्यावेळीही ते संघटनेबद्दलच बोलत होते. त्यांना त्यांच्या दुखण्याची कल्पना होती.

असोसिएशनचे पदाधिकारी म्हणून जरी ते पाच वर्षेच होते तरी त्यांचे कार्य अखेरपर्यंत चालूच होते. त्यांनी खालील कामात विशेष लक्ष घातले होते.

### Court Cases

i) Refund of pension fund contribution recovered from Officers (Pensioners and serving Officers)

ii) Interest at higher rate on the amount of refund &

iii) Cases of those who were eligible for family pension.

वरील कोर्ट केसेस यशस्वीपणे लढण्यात त्यांचा सहभाग होता. त्यावेळी संघटनेची आर्थिक परिस्थिती बिकट होती. कोर्टाच्या कामासाठी वारंवार मुंबईला जावे लागत असे. अशावेळी हॉटेल खर्च वाचवण्यासाठी सर्वजण घरून डबा घेऊन जात असत. तसेच टॅक्सी व रिक्शाचा वापरही करणे टाळीत असत. त्यावेळी सभासद संख्याही फारच कमी (१९८३ - सभासद संख्या ४१५) होती. अशा काळात कै. पराडकर व वर उल्लेखलेली मंडळी पदरमोड करून काम करीत असत.

वरील केसेस जिंकल्यानंतर सभासद संख्या वाढू लागली व देणग्याही मिळू लागल्या.

ऑगस्ट १९८८ मध्ये पेन्शन स्कीममध्ये बऱ्याच सुधारणा झाल्या. यामध्ये ''फॅमिली पेन्शन स्कीम'' प्रथमच आली. त्यावेळी कै. पराडकर जरी संघटनेचे पदाधिकारी नव्हते तरी त्यांनी यात विशेष लक्ष घातले व प्राविण्य संपादन केले. या विषयावरील बँकेची सर्वच महत्त्वाची सर्क्युलर्स त्यांचे संग्रहात असल्यामुळे बहुतेक जटिल केसेस त्यांचेकडे येत. पतीचे ३०/४० वर्षापूर्वी निधन झालेल्या महिलांच्या केसेस ''बँकेत रेकॉर्ड मिळत नाही'' म्हणून त्यांचेकडे येत. ठाणे येथील श्री. व्हि. एम. प्रभुदेसाई व पुण्यातील श्री. के. डी. पराडकर यांनी पाठविलेली महिलांची फॅमिली पेन्शन मंजूर करण्यासंबंधीची प्रकरणे इतकी अचूक असत की, Local Head Office अथवा त्यावेळचे Central Office यांच्याकडून फारसा विलंब न लागता ती लगेच मंजूर होत असत. त्यावेळी पती निधनानंतर, त्याच्या नावाव्यतिरिक्त, पत्नीला काहीही माहिती नसे. (अजूनही अशा केसेस सापडतात.) अशावेळी त्या जटिल केसेस कै. पराडकरांकडे येत. ते कौशल्याने संबंधित महिलांना त्यांच्या हक्काचे फॅमिली पेन्शन मिळवून देत. आतापर्यंत सुमारे ९५ महिलांना त्यांनी असे पेन्शन मिळवून दिले आहे. आता अपंग अपत्यासही फॅमिली पेन्शन मिळते. परंतु सुरुवातीस ते मिळण्यास खूपच त्रास होत असे. या संदर्भात मला मुद्दाम एका

केसचा उल्लेख करावा असे वाटते. आपल्या संघटनेचे माजी अध्यक्ष कै. श्री. पी. टी. चाफळकर यांच्या ५५ वर्षांच्या (त्यावेळी) अंध कन्येला फॅमिली पेन्शन मिळवून देण्यात श्री. पराडकरांना, अपार कष्ट पडले हे मला माहित आहे. भोर स्टेट बँक व बँक ऑफ औंध या स्टेट बँकेत विलीन झालेल्या बँकांच्या आठ निवृत्त सेवकांना पेन्शन व काही महिलांना फॅमिली पेन्शन मिळवून देण्यात त्यांना फार कष्ट झाले. कारण त्यांचे (लाभार्थींचे) जुने रेकॉर्ड मिळत नव्हते.

वरीलप्रमाणे कार्य करणाऱ्या श्री. पराडकर यांचा १० जुलै २००२ रोजी झालेल्या संस्थेच्या वार्षिक सभेत श्रीफळ, शाल, मानपत्र व 'कै. ल. ना. पाबळकर स्मृति सुवर्णपदक' देऊन यथोचित गौरव करण्याचा मान मला मिळाला. याचा मला खूप आनंद होतो.

आपल्या संघटनेची एक कमिटी मिटींग दि. २९/०४/२०१५ ला लोणावळ्याला झाली. त्याला कै. पराडकर हजर होते. मिटींग संपण्याच्या थोडे अगोदर ते उठले व म्हणाले 'आता माझी प्रकृती ठीक नसते. त्यामुळे या पुढे मी अशा सभांना येऊ शकेन असे वाटत नाही. म्हणून मी आज सर्वांना पेढे देऊन आपला निरोप घेतो.' त्यानंतर प्रत्येकाच्या जवळ जाऊन (दोन शब्द बोलून) त्यांनी आम्हांला दोन/दोन पेढे दिले. दुर्दैवानी खरोखरच त्यांची ती शेवटचीच सभा ठरली.

त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून, लेकी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो व त्यांच्या सर्व कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती लाभो हीच ईश्वरचरणी आम्हा सर्वांची प्रार्थना.

(कृतज्ञता
श्री. मधुकर पालकर
श्री. सदाशिव रबडे)

बा. ग. दांडेकर, ठाणे
९८६९०४३१६१

****************************************************************************************************

We are publishing hereunder a letter Dt. 04.10.2016 in respect of FFGHIS received from SBI Corporate Centre. We request our members to follow these instructions meticulously. ***- Secretary***

*****************************************************

Dear Sir,

We have been advised by the Insurance Co. and TPAs that members are submitting domiciliary bills as and when bills are generated and the frequency of submission by the member becomes 2 – 4 times a month. This has substantially increased no. of pending claims while the actual claims per member are less than that. The TPAs and the Insurance Co. are flooded with such claims and in turn, settlement is taking more time defeating the effort of maintaining TAT.

2. In this connection, please refer Para 5.18 of Annexure-I under Management of Claims attached with e-Circular no. CDO/P&HRD-PPFG/78/2015-16 dated 28.12.2015 wherein it has been advised that the claims would be settled once in a month.

3. For expediting settlement of claims and with a view to address delay complaints effectively, we reiterate that the domiciliary claims submitted by a member should be entertained / processed once in a month only. This will help in improving the services of the TPAs and the Insurance Co.

4. Please arrange to advise / counsel the members accordingly.

Thanks & Regards,
AGM (PPG)
SBI, Corporate Centre,
Mumbai
022-22741661

**Following officials may be contacted in case of need :**

United India Ins. Co.:
Mrs. Neeta Singh (DM) - 9820983990, 9869230574, 9920983990 and 022-22821762
Shri Sunil Walawalkar (official) - 9869002885 and 022-22821928
AnandRathi Insurance Brokers Ltd :
Mr. Mirza Baig - 8291707508 and 9969500748; Ms. Ritu Sharma - 9022102078 and 022-49093039
Mr. Chetan Shinde - 7045783143

## State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune

## Pune Zonal Sub Centre

### Minutes of Annual General Meeting held on 15th June 2016

The Annual General Meeting started at 4.15 p.m. at Niwara Vruddhashram Sabhagruha, Pune. Shri Ashok Pandit, Joint Secretary, invited all the Committee Members of Pune Z.S.C. and Shri V.V. Gandhe, General Secretary, Shri Sudhir Pawar, Joint Secretary and Shri D.A. Kulkarni, Treasurer, of Mumbai Circle on Dias. Then the Meeting started by lighting the auspicious lamp by these dignitaries. After presenting Ishastavan by Shri Ashok Pandit, Shri V.R. Kulkarni, Secretary, Pune ZSC, welcomed all members present in the hall and the dignitaries. Shri Kulkarni then started the Meeting as per Agenda, after seeking the permission from Shri Chandrakant Kulkarni, Chairmn. Shri Kulkarni, Secretary, read out the messages received from well-wishers for this AGM.

1) To Condole the death of members: Shri V.R. Kulkarni expressed sorrow and advised that there are 74 members who expired from the date of last AGM to 14-06-2016. Homage was paid to the departed souls by observing two minute silence.

2) To confirm the minutes of last AGM : Shri V.R. Kulkarni requested all the members to confirm the minutes of last AGM, published in 'Samvad' for February 2016, and suggest any additions/deletions therein. The minutes were confirmed, unanimously with clapping of hands by all the members.

3) The presentation of Secretary's Annual Report: Shri V.R. Kulkarni presented Secretay's Annual Report for 2015-16. He expressed gratitude towards all Committee Members of Pune Z.S.C., and District Representatives from Satara, Sangli, Solapur, Kolhapur, Ahmednagar and Pune, centres, where Association members and their family members are taking keen interest in attending periodical meetings, performing cultural programmes, and helping each others in solving their problems.

4) Felicitation of members who have completed 75 years of Age: i) The programme of felicitation of members who completed 75 years of Age during the period from the date of last AGM to 14th June 2016 was conducted, at the hands of Sarvashri V.V.Gandhe, Sudhir Pawar, and Chandrakant Kulkarni. ii) The felicitation of members whose birthday was on 15th June 2016, was also done at the hands of Shri V.V.Gandhe.

The above programme was compeered by Shri Ashok Pandit.

5) Reporting on the present Scenario about Pension issues: Shri V.V.Gandhe advised the gathering about updates on the front of Federation and Association, about various court cases. He expressed that the court matters may be concluded at an early date.

6) Biennial Election of Office Bearers of Pune Zonal Sub Centre for 2016-18: As per request by Shri S.G. Rabade, the Election Officer, Shri V.V. Gandhe, presented the results of the Biennial Elections of Office Bearers for 2016-18 as under :

| | | |
|---|---|---|
| Shri C. P. Kulkarni | : | President |
| Shri V. N. Kulkarni | : | Vice-President |
| Shri A. S. Pandit | : | Secretary |
| Shri P. H. Chate | : | Joint Secretary |
| Shri A. V. Konarde | : | Treasurer |

All the members in the Meeting hall, welcomed, and congratulated above elected office bearers by giving them a big hand.

7) **Problems relating to FFGHI Scheme :**

Following Representatives were present. They were welcomed by Shri Chandrakant Kulkarni, President.

Mr Sinha, V. P. ARIBL, Mr. Abhijit Phadtare, Representative, ARIBL, Mr. Amir Khan Inamdar Senior Manage, PHSPL,(TPA).

The difficulties regarding the new FFGHI Scheme, were expressed by many members. The problems were summarized by Shri Ashok Pandit and put in nut shell as follows :

a) Medical ID Cards not yet received.

b) No indication on Cards about 'B' Policy.

c) TPAs are, many times, not available on telephone.

d) Domiciliary Treatment Bills submitted in March/April 2016 neither sanctioned, nor returned. The TPA is unable to inform whether the respective bill is returned, for any reason. It is required to be advised to the concerned Insurer, by SMS on his mobile phone.

e) For Cashless treatment, for admission of Insurer in the Hospital, no proper guidance is quickly available on phone which causes more difficulties to our members.

f) Bills related to alternative treatment, e. g. Ayurved, Homeopathy are not sanctioned.

Shri Sinha, V. P. of ARIBL promised that Medical ID cards will be issued with priority and pending bills will be settled fast. However a large number of members were not satisfied with the replies given by the above officials.

8) Bank's Pensioners Meet: At this juncture, SBI Zonal Office functionaries arrived in and Bank's Pensioners Meet was conducted by them.

The Dry Fruit boxes were distributed to all members.The Meeting was concluded after extending vote of thanks by Shri V.N.Kulkurni, Vice President.

Secretary
(V.R.Kulkarni)

**************************************************************************************

The Minutes of the Bank's Pensioners' Meet of Pensioners from Zone I and Zone II was arranged on 15-6-16, at Niwara Vruddhashram Hall.

Shri Chandrakant Kulkarni, President, welcomed Sarvashri S. R. Jalnapure, Chief Manager (HR), Zone (I), V.V. Thakur Chief Manager, (HR), Zone (II), and Mrs. Sneha Kamble, Desk Officer, Zone (I). Shri Thakur welcomed all the members. He narrated the steps taken by the Bank in solving pensioners' difficulties and requested to submit problems, difficulties if any to the Z.O.

Shri Ashok Pandit, Joint Secretary, requested to approve the long outstanding Proposal of Dispensary at Hingne (k) Branch. Shri Vinod Naik, from Pimpri Chinchwad area, requested to open Dispensary at Pimpri, as the proposal for the same is already submitted to Z.O. Shri Chandrakant Kulkarni advised that Golwalkar Diagnostic Centre, has been discontinued since more than two years and there is no approved Diagnostic Centre at present. He requested to start the Centre immediately. Shri Jalnapure, assured that all the problems will be looked into and solved at an early date.

*- Secretary*

IN THE HIGH COURT OF DELHI AT NEW DELHI
W.P.(C) 1875/2013

FEDERATION OF STATE BANK OF INDIA AND ORS … … ... ... ... Petitioner
Through : Mr. Vidya Sagar and Mr. Debesh Panda, Advocates.

**versus**

THE UNION OF INDIA AND ORS … … … … … … ... ... Respondent
Through : Mr. Shreya Sinha and Mr. Kavindra Gill, Advocates for R-1.
Mr. Rajiv Kapur, Advocate for R-3 & 4.

CORAM :

HON'BLE MR. JUSTICE SANJIV KHANNA
HON'BLE MS. JUSTICE SUNITA GUPTA

**O R D E R**
**14.09.2016**

Counsel for the parties have obtained instructions and state that they have no objection to this Bench hearing the writ petition. It is not possible to take up the matter for hearing today as 13th September, 2016 was declared holiday and the matters relating to 13th September, 2016 are also listed today.

Counsel for the petitioner states that there has been non-compliance of the interim orders. Counsel for the respondents disputes the said version and submits that they have filed the necessary documents. The issue is left open, and if required would be examined on the next date.

Relist on 8th November, 2016 at the end of the board.

SANJIV KHANNA, J.
SEPTEMBER 14, 2016 SUNITA GUPTA, J.

*******************************************************************************************************

राजगुरू टुर्स तर्फे दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
स्टेट बँक परिवारासाठी कुठेही.... केव्हाही....

राजगुरू टुर्स™
जिव्हाळा जपणारी माणसं...

| | |
|---|---|
| स्पेशल/संपुर्ण मध्यप्रदेश | 2 नोव्हें,17 डिसें,14 जाने. |
| केरळ-रामेश्वर-मदुराई | 5 नोव्हें, 24 डिसें, 14 जाने. |
| हैद्राबाद-रामोजी-श्रीशैल्य | 25 डिसें, 22 जाने, 19 फेब्रु. |
| राजस्थान-मेवाड | 2 नोव्हें, 25 डिसें, 26 जाने. |
| सोमनाथ-द्वारका-गिरनार | 19 नोव्हें, 8 जाने, 19 फेब्रु |
| दुबई-अबुधाबी | 15 जाने, 6 फेब्रु, 8 मार्च |
| श्रीलंका | 18 फेब्रुवारी |
| अंदमान | 21 जाने, 28 फेब्रु, |
| मॉरीशस | 8 मार्च |

ज्येष्ठ नागरिक / महिला ग्रुपसाठी विमानवारी @ 9990
All Domestic individual Packages @ 15975 onwords
राजन पाडलोसकर (बोरीवली) 9322231216
दादर : 022-24318082 | 24381026 ठाणे : 25345606
www.rajgurutours.com • E-mail : rajgurutours@yahoo.in

ONLY FOR SENIOR CITIZENS
JUST FOR RELAXATION
*COMFORTABALE HOME STAY @ ALIBAG*
**Aashiyana Resort**
**3 NIGHTS 4 DAYS**
EVERY MONDAY CHECK IN & THURSDAY CHECK OUT
FOR 3 DAYS PACKAGE COST
**RS 2500/-** PER PERSON
NON AC ROOM STAY & VEG FOOD
NON VEG FOOD & AC ROOM COST EXTRA
*DAILY: BREAKFAST+LUNCH& DINNER WITH TEA COFFEE*
Contact: Rajesh Ranade
**750 7474 825**
*Post Akashi-Alibag-Murud Rd-Near Amit Beer Shoppy*

## Do not forget to furnish Life Certificate to the Bank during November every year

The Life Certificate can be furnished to any branch of State Bank of India, even in foreign countries.

Kindly note following instructions in respect of submission of Life Certificate

*************************************************

The Bank has issued instructions vide e-Circular No. CDO/P&HRD-PPFG/29/2011-12 dt. 3rd June 2011 to furnish Life Certificate in the following format. We reiterate the instructions as under :

1) To make it mandatory for all IBI/SBI/SBS/SBIN Pensioners and Family Pensioners to furnish life certificate in the month of November each year on the prescribed format, failing which pension will be stopped two months thereafter i.e. from the month of January.

2) Life certificate in the physical form may be submitted in the prescribed format by the pensioner / family pensioner not necessarily to the home branch where his / her pension account is maintained but to any branch. The acknowledgement of having received the Life Certificate will be issued to the pensioner / family pensioner by the Branch where the Life Certificate is submitted. After receiving the Life Certificate the branch (Home / Non Home) will verify the signature / thumb impression from CBS and update the same in the related HRMS site. **Life Certificate can be updated in the HRMS site by any officer of the branch**.

3) When Life Certificate is submitted at a Non Home Branch, after updating the record in HRMS, the branch shall forward the original Life Certificate to the Home Branch and retain a copy of the same for their record.

*******************************************************************************************

Federation has sought clarifications from the Bank in respect of submission of Life Certificate by those pensioners who happen to be in foreign countries during November. It is clarified that the Life Certificate can be furnished by such pensioners (i) to any branch of State Bank of India **OR** (ii) any other Indian Public Sector Bank located in that country **OR** (iii) arrange for obtaining their Life Certificate attested from an authorised official of the Embassy / High Commission of India or Counsel of India. After obtaining the Life Certificate duly attested as mentioned above, the pensioner may forward the same to their Pension-paying Branch immediately in November itself to avoid stopage of pension.

---

## फॅमिली पेन्शनर्ससाठी विशेष सूचना

ज्या फॅमिली पेन्शनर्सना 'म्युच्युअल वेल्फेअर स्कीम' अंतर्गत 'मंथली रिलीफ' ची रक्कम मिळते अशा फॅमिली पेन्शनर्सनी आपल्या पेन्शन पेइंग ब्रँचला जाऊन दोन स्वतंत्र लाइफ सर्टिफिकेट्स (एक रेग्युलर फॅमिली पेन्शनसाठी व दुसरे 'म्युच्युअल वेल्फेअर स्कीम' ची 'मंथली रिलीफ' ची रक्कम चालू राहण्यासाठी) देणे आवश्यक आहे. तसेच ब्रँच स्टाफला या दोन सर्टिफिकेट्स पैकी एक (वर 'म्युच्युअल वेल्फेअर स्कीम' अंतर्गत 'मंथली रिलीफ'साठी असे लिहून) आठवणीने झोनल ऑफिसला लगेच पाठवण्यास सांगावे. म्हणजे मंथली रिलीफची रक्कम मिळणे चालू राहिल. दोन्ही सर्टिफिकेटस्च्या ते मिळाल्याबद्दलच्या ॲक्नॉलेजमेंट्स ब्रँचकडून आठवणीने मागून घेऊन स्वत:जवळ जपून ठेवाव्यात.

***- सेक्रेटरी***

**ड्रायव्हिंग कोर्स** : गाडी चालकास पोलीस...

पोलीस - लायसेन्स आहे का? गाडी अशी चालवतात का? माणसांना मारायचं आहे का?

चालक - (पोलीसास) साहेब मी गाडी चालवायला शिकत आहे, गाडीवर ह्ळ_' चा बोर्ड सुद्धा लावला आहे.

पोलीस - (चालकास) तू गाडी शिकतोयस? मग तुझ्याबरोबर शिक्षक कुठे आहे?

चालक - (पोलीसास) साहेब शिक्षक बरोबर कसा असणार? मी 'कॉरस्पाँडन्स कोर्स' ने गाडी शिकतोय.

प्रभाकर गुपचूप, पुणे, मो. नं. ९८८१५७९४९९

### डोंबिवली-कल्याण युनिट सभासदांचा मेळावा

स्टेट बँक निवृत्त कर्मचाऱ्यांचा वार्षिक मेळावा **गुरुवार दि. १७ नोव्हेंबर २०१६ रोजी संध्याकाळी ४ वाजता** आपल्या बँकेच्या टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) शाखेत आयोजित केला आहे. सभेस आपल्या सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले उपस्थित राहणार आहेत. तरी डोंबिवली ते कल्याण-बदलापूर-टिटवाळा या भागातील सर्व सभासदांनी या मेळाव्यास उपस्थित रहावे ही विनंती.

**सुभाष आगरकर**

ऑर्गनाइझिंग सेक्रेटरी, डोंबिवली-कल्याण युनिट

लघुकथा

# संस्कार

सतीशचंद्र सोनटक्के

भुसावळ रेल्वेस्टेशन, प्लॅटफॉर्म क्रमांक ७ वर भुसावळ सुरत पॅसेंजर गाडी उभी आहे. उद्घोषणा कक्षातून घोषणा देण्यात आली. ''कृपया लक्ष द्या, भुसावळ सुरत पॅसेंजर गाडी सुटत आहे.'' त्याच वेळेस रेल्वेचे सेवानिवृत्त तिकीट तपासनीस श्री. दिनकर पाटील यांनी घाई घाईत गाडीच्या डब्यात प्रवेश केला. डब्यात इकडे तिकडे नजर फिरविली. बहुतेक प्रवासी अपडाऊन करणारे होते. त्यापैकी बरेचसे ओळखीचे होते. दिनकर पाटील ही व्यक्ती साधी सरळ, प्रामाणिक, कर्तव्य चोख पार पाडणारी, नीती आणि नियमाला धरून वागणारी आहे. कधीही चुकीचे काम केले नाही. ३७ वर्षांच्या नोकरीत त्यांना 'गुणवंत कामगार पुरस्कार' प्राप्त झाला होता. निष्कलंक सेवा, सर्व स्टाफमध्ये लोकप्रिय मनमिळाऊ म्हणून त्यांची ख्याती होती.

आज त्यांना अचानक काही महत्त्वाचे कामानिमित्त जळगाव येथे जायचे आहे आणि अचानक त्यांना जाणवले की, काही तरी चुकीचे काम आपल्याकडून घडले आहे. त्यांचे मन विषण्ण झाले. त्याची परिणती त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती, परंतु ते कोणाजवळ व्यक्त करू शकत नव्हते. मन सैरभैर झाले होते. अशी चूक आपल्याकडून का झाली? नोकरीत असताना ऑफिसमधील स्टाफ आणि प्रवासी सुद्धा त्यांच्याबद्दल चांगले उदगार काढायचे.

''अरे वा दिनकर पाटील T.C. अच्छा आदमी है,'' ते गाडीत कधीही कुणाला विनाकारण त्रास देत नसत. कोणी विना तिकीट प्रवास करीत असेल तर त्याला यथायोग्य दंड आकारून, भविष्यात असे करू नको. असा प्रेमळ सल्ला देत. रेल्वे ही जनतेची मालमत्ता आहे. आपण जर चुकीचे काम केले तर आपल्या शिक्षणाचा काय उपयोग? आपण रेल्वेचे उत्पन्न का बुडवायचे? पॅसेंजरकडून चिरीमिरी घेऊन, दंड न आकारता पैसे स्वतःच्या खिशात टाकण्याची सवय इतर स्टाफमध्ये होती; परंतु दिनकरराव ह्यांचेवर झालेले संस्कार आणि शांत, सरळमार्गी सुस्वभावीवृत्ती ह्या गुणांमुळे त्यांच्या मनात वरकमाई करावी असा विचार सुद्धा कधीच आला नाही. आपले काम चोख करावे असा त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे त्यांचे मन स्वास्थ्य, शरीरस्वास्थ्य सुद्धा निरोगी असावयाचे. सदा हसतमुख चांगला सल्ला देणारे अशी त्यांची ख्याती होती.

भुतकाळातील आठवणीत मग्न असताना जळगाव स्टेशन केव्हा आले त्यांना कळलेसुद्धा नाही. ते प्लॅटफॉर्मवर उतरले. थोडा वेळ थांबले. पण चेहरा चिंताग्रस्त. आपण अपराध केला आहे हा भाव. त्यांनी काय चुकीचे काम केले असेल बरे?

त्यांनी लगेच जिना चढण्यास सुरूवात केली. समोरच T.C. श्री. जोशी. दिनकररावांना त्यांनी नमस्कार केला. विचारपूस केली आणि श्री. दिनकररावांनी त्यांचा निरोप घेतला.

श्री. दिनकरराव बाहेर आले आणि तडक तिकीट घेण्यासाठी रांगेत उभे राहिले. रांगेत पुढे १०/१५ माणसे उभी होती. त्यांचा नंबर आला, रु. १० ची नोट काढली आणि म्हणाले एक तिकीट भुसावळ द्या, तिकीट घेतले. बाहेर आले त्यांच्या मागे मी उभा होतो. मी सुद्धा पाचोरा येथील तिकीट घेतले. गाडीला १०/१५ मिनिटे वेळ होता म्हणून काही वेळ तिथेच थांबलो. तेवढ्यात श्री. दिनकरराव ह्यांचेकडे लक्ष गेले. त्यांनी ते तिकीट फाडून टाकले आणि त्याचे तुकडे डस्टबीनमध्ये टाकले. मला कुतूहल वाटले, काय वेडा माणूस आहे. जर भुसावळला जायचे नव्हते तर तिकीट का घेतले? इतका वेळ रांगेत उभे राहण्याचे प्रयोजन काय? अशा अनेक प्रश्नांचे काहूर माझ्या मनात माजले. शेवटी न राहवून मी त्यांना म्हणालो.

''माफ करा. मी तुम्हाला ओळखत नाही. पण विचारू का? आपण तिकीट का फाडले?'' त्यांनी माझ्याकडे एक कटाक्ष टाकला आणि म्हणाले, ''तुम्हास नाही कळणार मी असे का केले ते.'' आता माझ्या मनातली जिज्ञासा जागृत झाली मी म्हणालो, ''तुम्ही कारण काय ते सांगावं'' त्यावर पुढील शब्दात दिनकररावांनी आपल्या कृतीने स्पष्टीकरण व समर्थन केले होते.

''मी भुसावळ ते जळगाव घाईत विना तिकीट प्रवास केला आणि चुकीने तिकीट काढण्याचे विसरलो. मी सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी T.C. (तिकीट तपासनीस) असल्याने मला कोणी विचारले नाही, पण माझी सद्सद्विवेकबुद्धी आणि संस्कार मला स्वस्थ बसू देईनात. आपण रेल्वेचे नुकसान करीत आहोत. मला काय अधिकार आहे विना तिकीट प्रवास करण्याचा? नोकरीत असताना विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून मी दंड वसुल करीत असे. मी जर रेल्वेचा महसूल बुडविला तर पेन्शन घेण्याचा मला काय नैतिक अधिकार आहे? मला ते पुढे मिळेल काय? प्रत्येकाने जर असाच विचार केला तरच रेल्वेची आणि पर्यायाने देशाची प्रगती होईल. मला एक आत्मिक समाधान आहे. की विना तिकीट प्रवास केला; परंतु रेल्वेला फसविले नाही. प्रवासाचे भाडे म्हणून तिकीट घेऊन फाडून टाकले. एका अर्थाने मी अपराध (चुकीने) करून सुद्धा त्याचे परिमार्जन म्हणून रेल्वेच्या महसुलात योग दान दिले.''

दिनकररावांचे हे सविस्तर उत्तर ऐकून माझे मन सुन्न झाले व मी नकळत त्यांच्यापुढे नतमस्तक झालो.

१९/१६

सतीशचंद्र सोनटक्के, भुसावळ
मो. ९७६७३३७२८०

ललित

# स्पेस

सौ. उज्ज्वल ब्रम्हांडकर

परवा फोन वाजला. नंबर ओळखीचा नव्हता. घेतला तर पलीकडून नेहा - माझ्या मैत्रिणीची सून बोलत होती. ''मावशी, मी मुद्दाम फोन केलाय तुम्हाला. मला काही सांगायचंय वेळ आहे ना? की कामात आहात?

''नाही नाही. सांग ना'' - मी उत्तरले - ''अगदी मनमोकळेपणानं बोल.''

''मावशी, हल्ली सासूबाई आम्हा दोघांशी खूप परकेपणानं वागतात. अभिनवचे बाबासुद्धा ह्यांच्याशी जेवढ्यास तेवढंच बोलतात.''

''तुला असं का वाटलं?''

''मागच्या आठवड्यात माझं आणि अभिनवचं खूप भांडण झालं. आम्ही काही कामासाठी बाहेर गेलो होतो. तेव्हा बोलता बोला अचानकच भांडण झालं.''

''बरं, मग?''

मला कळेना ही जे सांगतेय त्याचा तिच्या सासूशी काय संबंध? उर्वशीचा बऱ्याच दिवसात फोन नव्हता आला. नाहीतर माझी खात्री आहे की, तिनं मला हे नक्कीच सांगितलं असतं.

''घरी आल्यानंतर आम्ही दोघं गप्प गप्पच होतो'' - नेहानं पुढे सांगायला सुरुवात केली - '' तेव्हाच काय पण गेला आठवडाभर आम्ही दोघंही एकमेकांशी कामापुरतंच बोलतोय. पण अभिनवच्या आईबाबांनी चकार शब्दानंही विचारलं नाही की काय झालं?''

''अग, मग तुम्ही स्वतःहून सांगायचं की त्यांना!''

'' पण त्यांना नाही वाटत आपुलकीनं आम्हाला विचारावं असं? हे तर सरळ सरळ दुर्लक्षच झालं.''

''बरं बरं. मी विचारते तिला आणि नंतर तुला फोन करीन हं'' - असं म्हणून मी संभाषण आटोपतं घेतलं. आणि लगेचच उर्वशीला फोन केला. इकडच्या तिकडच्या जुजबी गप्पा झाल्यावर मी विचारलं -

''काय, नेहा काय म्हणते? आणि अभिनव? बरे आहेत नं दोघं?''

''नाही गं काहीतरी बिनसलंय वाटतं त्यांचं''- उर्वशी म्हणाली.

''काय झालं?''

''माहीत नाही. मी काही विचारलं नाही.''

''काऽऽऽ?'' - मी आश्चर्यानं विचारलं - ''अग, घरात मुलांचं काय बिनसलंय ते आपणच विचारायला हवं ना?''

''नाही ग बाई! आमच्याकडे नाही चालत तसं. मध्ये एकदा नेहा अशीच चिडचिड करीत होती. मी विचारलं तर प्रथम उडवाउडवीची उत्तरं दिली. मी खोदून खोदून विचारल्यावर म्हणाली - ''तुम्ही नका पडू त्यात! आमची नवरा-बायकोची भांडणं आहेत. तुम्हांला काय सांगायचं? सांगितलं तरी तुम्ही तुमच्या मुलाचीच बाजू घेणार. थोडीसुद्धा स्पेस देत नाही तुम्ही आम्हाला'' नेहाच्या उत्तरानं मी थक्कच झाले.''

थोडा वेळ इतर गप्पा मारून मी फोन ठेवला. पण नंतर सतत त्या दोघींचं बोलणं मनात घुमत राहिलं. एक गोष्ट लक्षात आली - ही 'स्पेस' ची मारामारी होती तर!

हल्ली जिथं तिथं हेच ऐकू येतंय - 'स्पेस हवी' किंवा 'स्पेस द्यायला हवी' पण ही 'स्पेस' म्हणजे नेमकं काय हो? स्वातंत्र्य? आत्ताच ह्याची 'गरज' का वाटायला लागलीय? पूर्वीपासून आमच्या पिढीला होतं की हे स्वातंत्र्य. आमच्या मागच्या पिढीलाही आमच्याशी वागताना हे स्वातंत्र्य होतंच - कुणीही कुणाकडे न मागताच मिळालं होतं ते. घरात मनमोकळेपणा होता - अगदी भांडणांचासुद्धा. भांडणं घरची माणसं आनंदानं सोडवीत असत - हक्कानं. क्वचित मित्र मैत्रिणींचेही सल्ले घेतले जात. नवरा बायकोमध्ये सुद्धा मतांची लपवाछपवी नव्हती. आमच्या पिढीनं बहुतेक निर्णय नवराबायकोनं चर्चा करुनच एकमतानं घेतलेले किंवा घरच्या माणसांच्या सहकार्याने घेतलेले असत. एकमेकांचे सल्ले घेतले जात, मानलेही जात. पण लादले जात नसत. आता तर असे निर्णय दुसऱ्यावर 'लादण्याचा' विचार कुणाच्याही मनात नसतो. आणि तरीही प्रत्येकाची तक्रार 'स्पेस' मिळत नाही हीच असते.

पण नेहा तर नवीन पिढीमधली. तिला व तिच्या नवऱ्याला सासू-सासरे स्पेस देतात. त्यांचं मन शांत होऊन स्वतःचे प्रॉब्लेम्स किंवा आपापसातली भांडणं सोडवायला वेळ देतात तर नेहाला तेही आवडत नाही - म्हणजे 'स्पेस' चा अर्थ ती 'दुर्लक्ष' असा लावतेय. म्हणजे मग नेमकी स्पेस किती द्यायची, कधी द्यायची, द्यायची की नाही, घेणाऱ्यानं ती घ्यायची की नाही की तिला 'दुर्लक्षित' मानायचं, हे गणित कोण सोडवणार? कारण ह्या गणिताची पुन्हा प्रत्येकाची रीत निराळी आणि त्यामुळं मिळणारं उत्तरही वेगवेगळंच.

नेहाच्या मतानं ते दुर्लक्ष होतं आणि अगोदरच्या प्रसंगामधलं उर्वशीचं विचारणं नेहाला तिच्या स्वातंत्र्यावरचा 'स्पेस' वरचा घाला वाटत होता. आता नेहाला सासू-सासऱ्यांच्या

'आपुलकी'ची तहान लागली होती. पण जेव्हा सासूनं स्वतःहून आपुलकीनं विचारलं होतं तेव्हा ते तिला कळलं नव्हतं की तेव्हा ती आपुलकी तिला नको होती? आता हे ठरवायचं कसं की दुसऱ्याला आपुलकी कधी हवीय ते? की दुसऱ्याला आपुलकीनं विचारायचं, त्यानं ती लक्षात घेतली तर ठीक, नाहीतर झिडकारायला, फटकारायला दुसरा मोकळा? सोशल मिडीयावर गळे काढून घरच्यांच्या तक्रारी अनोळखी लोकांकडे ही नवीन पिढी करते, (सगळेच तसं करीत नाहीत हं!) तेव्हा त्यांची 'स्पेस' ची तहान कुठे जाते?

खरं तर 'पुढच्या पिढीनं सल्ला मागितला तरच द्यावा' हा सल्ला आम्हाला आमच्या मागच्या पिढीनं आम्ही न मागताच दिला - अनाहूतपणे (आणि तसे ''सल्ले'' एकमेकांकडे मनमोकळेपणानं मागितले किंवा एकमेकांना दिले जात.) पण आता त्यासाठी समोरच्यानं तोंड तर उघडायला हवं. दुसऱ्याच्या मनातलं कळणार कसं? दुसऱ्याला नेमकी स्पेस कधी द्यायची हे कळणं शहाणपणाचं हेही बरोबर आहे. पण ही शहाणपणाची वेस ठरवायची कुणी नी कशी? हे तर व्यक्तिसापेक्ष आहे. म्हणजे आता आपल्या दुसऱ्याबद्दलच्या अपेक्षा बदलल्यात की काय? की वाढल्यात?

एवढे नवनवीन शोध लागतात. त्यात हे दुसऱ्याच्या मनातले विचार ओळखण्याचं यंत्र कुणी शोधलं तर घरोघरची अशी पेल्यातली - क्वचित मोठ्ठी होऊ पाहणारी - वादळं नक्कीच शमतील. आता 'मनकवडेपणा' ही खूपच मोठी गरज बनलीय. सगळंच ऑनलाईन - एका क्लिकवर मिळत असण्याच्या ह्या काळात मन ऑनलाईन कधी 'क्लिक' होणार आणि इंटरनेटच्या ''फास्ट - (आणखी फास्ट)'' च्या जमान्यात कधी चटकन् 'ओपन' होणार?

२६/१६

सौ. उज्ज्वल र. ब्रम्हांडकर, विरार (पूर्व)
मो. : ९८३३१६५५५७

★★★★★★★★★★★★★

## सभासदांसाठी सूचना

**बरेच सभासद उदारपणे देणगीचे चेक** Editor Samvad **किंवा फक्त** Samvad **ह्या नावाने पाठवित असतात. आपले खाते फक्त** SBI Pensioners Asso. **अशा एकाच नावाने आहे. तरी कोणत्याही स्वरूपाची देणगी चेक** SBI Pensioners Asso **ह्याच नावाने पाठवावा ही विनंती.**

**सेक्रेटरी**

## काळ सारखा धावतोय

काल-आज-उद्याचा, टोला सारखा वाजतोय
थांबत नाही कोणासाठी, काळ सारखा धावतोय!
उन्हाची तलखी,
जणु वणव्याची झळ
शिशिराच्या तडाख्यात,
चैतन्याची पानगळ
नंतर येतो वरुणराजा, वरून अमृत सांडतोय!
किती सिकंदर आले,
जग जिंकून गेले.
झाले किती संत-थोर,
नाही कोणी उरले
स्मृती जाती खोल-खोल, नवा अंकुर वाढतोय!
पणती-मशाल गेले कधीच,
कंदिल-बत्ती आले
तेही झाले जुने-पुराणे,
विजेत रंग न्हाले
कोळसा-पाणी-पेट्रोलला, अणु बाय-बाय करतोय!
प्रेम-माया आटत गेली,
शिल्लक नाही आपुलकी
स्वार्थापुढे उरली नाही,
नात्या-गोत्यांची बांधिलकी
माणुसकीचा घास आता, माणूसच मागतोय!


**४७/१४**

**श्री. गोविंद करमरकर**
**मोबा. : ८८०५९५९८२४**

★★★★★★★★★★★★★

*विनोद*

## कंजूष



चंदु (मित्रास) - अरे! तू आंघोळ केल्यावर लगेचच फोन करीन असे काल म्हणाला होतास, मी दिवसभर तुझ्या फोनची वाट पाहत होतो. मग काय झालं?


मित्र - (चंदुस) बरोबर आहे. मी आंघोळ केल्यावर फोन करीन असे म्हणालो होतो. अरे! पण काल मी आंघोळच केली नाही.

प्रभाकर गुपचूप, पुणे
मो. नं. ९८८१५७९४९९

लघुकथा

# नाटकातलं ‘नाटक’

वसंत धुपकर



एक मध्यमवयीन जोडपं नाट्यगृहात नाटक बघत असताना आणि पति महाशय, त्या तरुण नटीकडे टक लावून पाहत असताना शेजारी बसलेल्या अर्धांगिनीने त्याला हाताच्या खुब्याने जोरात ढोसले व त्याचा हात हातात घेऊन, त्याच्या हातावर चघळण्यासाठी चॉकलेट ठेवले. ते नेमके गडबडीत खाली पडले. कारण पतिराजांचे सर्व लक्ष स्टेजवर चाललेल्या प्रेमप्रसंगावर होते.

‘‘अहो! तुमचे लक्ष कुठे आहे?’’

‘‘नाटकाकडे’’

‘‘इश्श! एवढं टक लावून बघायचं असतं का? (पत्नीकडे न पाहता) ‘‘अग नाटक हे ‘टक’ लावूनच बघायचं असतं. किती छान दिसतेय ती...!’’

‘‘छे! एवढी काही बरी वाटत नाही.’’

‘‘अगं ती बरी नसती तर तिला निर्मात्यानं नाटकात घेतली असती का?’’

‘‘अहो नवीन आहे ती! स्वस्तात मिळाली असेल. किती भडक मेकअप् केला आहे तीने. अन् कपडेही किती तोकडे घातले आहेत.’’

‘‘अग एका प्रयोगाचे ती दहा हजार रुपये घेते.’’

‘‘तुम्हाला काय माहिती? तुम्ही तिचे अकौंट ठेवता की काय?’’

‘‘मी तसे पेपरमध्ये वाचले होते.’’

‘‘माझ्या वाचनात नाही आले.’’

‘‘तू पेपर नीट वाचतेस का?’’

‘‘हो! मी सगळा पेपर नीट वाचते.’’

‘‘होऽऽ अगं तू फक्त सेल, फॅशन, विविध रेसिपीज् चे कॉलम वाचीत असतेस.’’

‘‘हो, मग इतर बातम्यांमध्ये नवीन काय असते? भ्रष्टाचार, बलात्कार, दरोडे, मोर्चे, विविध सेनांचा राडा, राजकारण्यांची बाष्कळ मुक्ताफळे आणि नंतर त्यावर खुलासे, प्रतिखुलासे, खोटे-नाटे आरोप त्यावर न पटणारे खुलासे-प्रतिखुलासे.

‘‘अगं त्यामुळे हल्ली सर्वसामान्यांची चांगली करमणूक होते.’’

‘‘आणि काय हो! रेसिपीज्चे पदार्थ कसे मिटक्या मारीत खाता, काहीतरी वेगळे कर असं तुम्हीच म्हणता ना!’’

‘‘अगं तू एवढा अभ्यास करून, कष्ट करून पदार्थ करतेस, त्यांना न्याय द्यायला नको का?’’

‘‘हो, पण आपले वजन वाढते आहे, पोट सुटले आहे इकडे लक्ष आहे का?’’

‘‘मग त्यासाठी सकाळी फिरायला जातो की!’’

‘‘फिरायला? कि मित्रांबरोबर चकाट्या पिटायला, आणि नंतर हॉटेलात, वडा-पाव, मिसळ, भजी काय काय हादडत असता.’’

‘‘अगं ते बसून गप्पा मारण्यासाठी निमित्त असतं.’’

‘‘आणि खर्चाचे काय?’’

‘‘ते आम्ही आळी-पाळीने करीत असतो’’

‘‘मला नाही वाटत. तुम्ही भोळे आहात, तुमचे मित्र तुम्हाला ‘बकरा’ करीत असतील.’’

‘‘मित्र कशाला बकरा करतील? तुझ्या पिताश्रींनी आधीच माझा बकरा केला आहे.’’

‘‘अहो आता तुम्ही माझ्या बाबांवर का घसरलात?’’

‘‘ Sorry, Sorry! चुकलं.’’

(रडक्या सुरात) काहीही वाद निघाला कि तुम्ही माझ्या माहेरच्या माणसांना मधे ओढता.’’

‘‘Sorry, Sorry, म्हटले ना मी.’’

‘‘उगीच मी नाटकाचा हट्ट धरला आणि तुमच्या सोबत आले. एकटी आले असते तर बरे झाले असते.’’ (थोडी धुसफुस)

(पती-आगतिक होऊन) ‘‘अगं आता किती वेळा सॉरी म्हणू?’

तेवढ्यात मागच्या लाईनीतील प्रेक्षक बडबडला.

''अहो! आम्ही तिकीट काढून नाटक बघायला आणि संवाद ऐकायला आलो आहोत. तुमचे नाटक अन् संवाद बंद कराल का? घरी या नाटकाचे अनेक प्रयोग झाले असतीलच!''

पती, अर्धवट मागे वळून ''तुम्हाला काय माहित?''

''अनुभवाने बोलतो आहे.''

(पती मागे वळून त्या प्रेक्षकाकडे थोडे रागाने बघतो.)

''अरे जोश्या तू?''

अरे मध्या तू होय! तरीच म्हटलं आवाज जरा ओळखीचा वाटतोय ''मी जरा उशीराच आलो, त्यामुळे तुमची जोडी दिसली नाही.''

मधु - ''परवा तुझा दोस्त भेटला होता. दिले का त्याने तुझे पैसे परत?

जोशी - ''नाही रे!''

मधु - ''तुला त्याची माहिती असून, तू कसा काय फसलास?''

जोशी - ''हो नं! पण मी त्याला सोडणार नाही.''

(जोशीच्या शेजारचा प्रेक्षक) आता तुम्ही तुमचे डायलॉग आटोपते घ्या. नाटक संपल्यावर २ रा अंक सुरू करा तूर्त नाटक बघा! आणि आम्हालाही बघू द्या!

५१/१६

वसंत धुपकर
मो. ८९७५२१८०४९

## प्रतिसाद

आपण 'संवाद'साठी घेत असलेल्या श्रमाला, कष्टाला तोडच नाही. ह्या वयात आपण सर्व कसे सांभाळता हे आम्हा वाचकांना पडलेले कोडे सोडवताना, श्री. आठवले, गुपचूप, धुपकर, शिंगवेकर आपल्या कष्टाला, कल्पकतेला माझा 'प्रेमळ सलाम'. ईश्वर आपणा सर्वांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य देवो.

प्रत्येक अंकातील 'संपादकीय' अग्रलेख विचारपूर्ण, माहितीपूर्ण, ज्ञानवर्धक असतो.

अशोक बुटाला, मुंबई

## तेथे पाहिजे जातीचे

दूरवरी ते सुंदर डोंगर
माथा त्यांच्या निलाई सुंदर
धुके तरळे धूसर धूसर
हलकेच येते पर्जन्य-सर

निळसर डोंगरी, लपले साहस
वाट काट्यांची, श्वापदांचे भास
निसरड्या वाटा, कराल कपारी
साहून सारे, जाशील का बरी?

शिखरावरती आनंद अपार
शिखर तुला पण होईल का सर?

बुद्धीचे सावध ऐकूनी इशारे
उसळत्या मनाला पडले बंधारे
आपोआप झाली शांत माझी ऊर्मी
बुद्धीचा तो घाव बसला की वर्मी

मजला कळेना, गिर्यारोहकाना
कुठून मिळते साहसी प्रेरणा!
कसले हे वेड, सिद्ध करी त्यांना
कसल्या त्या ऊर्मी, कुठल्या धारणा!

काम ते नाही हो येरा गबाळ्याचे
पटले मला, तेथे पाहिजे जातीचे

८३/१६

उर्मिला परांजपे, मुंबई
मो : ९८२०४४०३४८

## नशीब

का असे नशिबात खोटे
नियतीचे खेळही उफराटे
सुखाचे लावले रोप छोटे
उगवले फक्त दुःखाचे काटे

विजयकुमार देशपांडे , सोलापूर
मो. ९०११६६७१२७

६९/१६

*अनुभव*

# भेटले ते सर्व देवदूतच

प्रभाकर गुपचूप



दिवाळी नंतर कुठेतरी बाहेर जायचे असा अगोदरच बेत पक्का केला होता. दिवेआगर माझ्याशिवाय कुणीच बघितले नसल्याने दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन ट्रीप करण्याचे ठरले. दिवेआगर येथील हॉटेल बुकींग केले होते. दिवाळीत लक्ष्मीपूजन करून दुसऱ्या दिवशी निघालो. मुलगा, सून, मुली, जावई आणि नातवंडे असे आम्ही दहा जण असल्यामुळे मिनी बस ठरवली होती. सकाळी सात वाजता निघून साडेबारा वाजता दिवेआगरला पोचलो. जेवणानंतर थोडी विश्रांती घेऊन दुपारी चार वाजता हरिहरेश्वरला जाण्यासाठी निघालो. सव्वापाच वाजता तेथे पोहोचलो. मंदिरात गर्दी नसल्यामुळे देवदर्शन उत्तम झाले. लगेचच बीचवर गेलो. अंधार पडायला सुरुवात झाली होती. म्हणून बीचवरून लवकर निघालो. पावसाचे बारीक थेंब पडायला लागले होते. त्यामुळे उशीर न करता दिवेआगरची वाट धरली.

दहा मिनिटांतच विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. त्याचा जोर वाढतच होता. मिट्ट काळोख, अरुंद रस्ता, पुढचं काहीच दिसत नव्हतं, अशा परिस्थितीत अचानक गाडीचे दोन्ही हेडलॅम्प गेले. त्या मिट्ट अंधारात काय करावे, काही सुचेना, गाडी कडेला उभी करणे गरजेचे होते. बॅटरीच्या मदतीने गाडी कडेला उभी केली. ड्रायव्हरने आपल्यापरीने दुरुस्तीचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरला. त्याने पुण्याला आपल्या सहकाऱ्याला फोन लावून त्याला सर्व हकीकत कथन केली. त्याच्याकडून जशा सूचना येतील तसे चालकाने सर्व प्रयत्न करून बघितले, पण काही उपयोग झाला नाही. आता आम्हाला जास्तच काळजी वाटायला लागली. पावसाचे थैमान, त्यात अंधार. वाटेत कुणीतरी भेटेल अशी आशा करीत होतो. पावसाचा जोर जरा कमी झाला होता.

तेवढ्यात कोणी एक माणूस पायी येताना दिसला. बॅटरी जवळ होतीच. तो गाडीजवळ येताच त्याला थांबवले. त्याला सर्व हकीकत सांगितली. त्याने पुढे एक-दीड किलोमीटरवर रानवाडी गाव लागेल, असे सांगितले व तो चालू लागला. काहीही करून रानवाडी गावापर्यंत जायचे असे ठरवले. एवढ्यात मागून एक दुचाकी येताना दिसली. त्या गृहस्थांना आम्ही थांबण्याची विनंती केली. त्यांना आमची अडचण सांगितली. त्यांनी माझ्या गाडीमागे हळूहळू या असे सुचवले. वाटेत त्या गृहस्थाने त्या गावाची माहिती दिली. पाऊस पूर्णपणे थांबला नव्हता. रानवाडी गाव आले.

रस्त्यावर एकच दिवा होता. तेथे एकच चहाची गाडी होती आणि चाळवजा एक बैठी इमारत होती. सर्वजण गाडीतून उतरलो. दुचाकीस्वाराला शतशः धन्यवाद दिले. जवळचे सर्व खाद्यपदार्थ संपले होते. टपरीवाल्याकडे चौकशी केली. तो टपरी बंद करायच्या तयारीत होता. सर्वांना खूपच भूक लागली होती. पावसाची रिमझिम सुरुच होती. चारच वडे आणि आमचे नशीब म्हणून त्याच्याकडे दूध शिल्लक असल्यामुळे आम्ही त्याला चहा करण्याची विनंती केली. आम्ही चहा घेतला. त्याला आमची अडचण सांगितली व आणखी वडे मिळतील का ते विचारले. चार-पाच वडे होतील एवढेच पिठ आहे. आम्ही वडे द्या असे सांगितल्यावर त्याने स्टोव्ह पेटवला. थोड्याच वेळात वड्याचा आस्वाद घेतला. त्याच्याजवळच गाडीचे दिवे दुरुस्त करण्यासाठी एखादा इलेक्ट्रिशियन जवळपास ओळखीचा आहे का, अशी चौकशी केली. एव्हाना तेथे गावातील जवळचे चार-पाच जण जमले. त्यांनी आमची अडचण ओळखली. पंधरा-वीस मिनिटे आम्ही वाट पाहिली. तो घरी नसल्याचे कळले. दोघा-तिघांच्या मदतीने त्याचा मोबाईल नंबर मिळवला व त्याच्याशी संपर्क साधला. घरून सर्व सामान घेऊन लवकरच येतो काळजी करू नका म्हणून सांग असा निरोप त्याने फोनवर दिला.

थोड्याच वेळात तो दुचाकी घेऊन आला. त्याने हेडलाईट चेक केले. फॉल्ट शोधून काढला, अर्ध्या तासात हेडलाईट चालू केले. दोन-तीनदा ट्रायल घेतली. हे होईपर्यंत आम्ही चाळीच्या पायऱ्यांवर बसून होतो. चाळीतील एक घर उघडे दिसले. त्यांच्याकडे पाणी मागितले. त्यांनी लगेचच एक छोटा हंडा पाणी आणि भांडे आणून दिले. गाडीचे दिवे दुरुस्त झाल्यामुळे मनावरचे दडपण गेले व सुटकेचा निःश्वास सोडला. ईलेक्ट्रिशियनचे आभार मानावे तेवढे थोडेच होते. त्याचे नाव गाव वगैरे चौकशी केली. आपले नाव मुदस्सर असल्याचे त्याने सांगितले. ही दुरुस्ती तात्पुरती आहे, तुम्ही सहज दिवेआगरपर्यंत जाल. तिथे मात्र गाडी दाखवून पूर्ण चेकिंग करून घ्या, असे त्याने सुचवले. दुरुस्तीचे पैसे किती द्यायचे असे मुदस्सरला विचारल्यावर विनम्रतेने काही नको म्हणून

त्याने सांगितले. काहीतरी पैसे तुम्ही घ्याच असा आग्रह केल्यावर सुद्धा तो आपल्या निश्चयाशी ठाम होता. ज्या गृहस्थाने मुदस्सरची माहिती दिली, त्यांनाही आम्ही पैसे देऊ केले होते. त्यांनीही काही नको असेच सांगितले. मग तेथील जमलेल्या सर्व लोकांचे आभार मानून आम्ही गाडीत बसलो. वाटेत नंतर कोणतीही अडचण आली नाही आणि दिवेआगरला पोचलो, तेव्हा रात्रीचे साडेनऊ वाजले होते. मनात एक विचार आला, मनोभावे देवदर्शन झाल्यावर या प्रसंगात आम्हास माणुसकीचा, आपलेपणाचा भाव दाखवणारा गाव जवळच आहे हे सांगणारा तो माणूस, रस्ता दाखवणारा तो दुचाकीस्वार, चहा, वडा तयार करून देणारा तो दुकानाचा मालक निःसंकोचपणे पाणी देणारे ते चाळीतील गृहस्थ आणि शेवटी आमच्या गाडीचे हेडलाईट दुरुस्त करणारा इलेक्ट्रिशियन मुदस्सर हे सर्वजण आम्हास प्रवासात भेटलेले देवदूतच नव्हे तर कोण?

प्रभाकर गुपचूप, पुणे

मो. नं. ९८८१५७९४९९

★★★★★★★★★★★★★

*विनोद*



## नशीब आपापले

मदन – मिने, मी तुझ्या घरी गेलो होतो. आता आपले लग्न होईल असे वाटत नाही.

मीना – नको रे असे बोलूस! तुला असे का वाटते, तुला बाबा भेटले की काय?

मदन – नाही ग! तुझी लहान बहीण भेटली.

★★★★★★★★★★★★★

गुरुजी – आत्ताच आपण शास्त्रीय कारणे व उपाय शिकलो. सांगा बरे, कानात खडा गेल्यास काय कराल? रमेश तू सांग.


रमेश – अंऽअं, कानात खडा गेल्यास कानाचा पडदा फाटू शकतो, माणूस बहिरा होऊ शकतो. खूप वाईट असते ते. म्हणून घालूच नये, जाऊ देऊ नये. गेलाच नाही तर उपायाचा प्रश्नच नाही.

५०/१६

भरत जैन, नाशिक

मो. नं. ८३८००३७८०९

## सौदामिनी



आकाशाची गर्द निळाई, क्षणभर झाली
लखलख,कुठूनी आला, कुठे निघाला
विजेचा वारू अबलख
या वारूने घात केला गरीबांच्या झोपडीचा
आणि उन्मळून पडला वृक्ष मुळासकट
कडुनिंबाचा

सौदामिनीने राख केली भव्य त्या
कडुनिंबाची खट्याळ वाऱ्या वादळवाऱ्या
खास तुझी ही क्रिया

पण अनेकांचे जीव जाती जन्मा येऊन वाया!
सौदामिनी ती जेव्हा लखलखते आकाशात
सौंदर्य बघावे तिचे बसून घरच्या गवाक्षात

प्रतितलाही उपमा मिळते सौदामिनीची
दोहोंची निर्मिती मात्र आहे भिन्नतेची
एक प्रसवते सृजनता, एक करते आयुष्याची राख
न कर सौदामिनी गरीबांच्या झोपडीचा नाश

४१/१६

सौ. वैशाली रावळ, पुणे

मो. ९४२२८३५९३७

## तृप्ती

देह धावला, धावला
मार्ग शोधिला, शोधिला
पाय चालले वारी
विठुमय मने सारी

पुढे अनंत ब्रह्मांड
घडे अशी भेट
पाय विठुचे धरता
सरे संकट, संकट

असे तृप्त मन
गाई भक्तीत गुणगान
लागे चालू नंतर
वाट परतीची परत

मुखी नाम तरीही
सदा येतच राही
परतीच्या वाटेवरही
डोळा रूप साठवी

८२/१६

कल्पना कोठारे,
सांताक्रुझ

*लघुकथा*

# साथ-साथ

माधव नाडकर्णी

घडाळ्यात पाच वाजलेले पाहून अलकाने शिऱ्यासाठी रवा भाजायला घेतला. दीपकला साजूक तुपातला शिरा म्हणजे जीव की प्राण! आल्या आल्या आपल्या हातचा शिरा आणि मसालेभात बघून तो किती खूष होईल, ह्या कल्पनेनेच अलका मनातल्या मनात सुखावली. तसं बघायला गेलं तर, अलकाचा बालवाडीतील शिक्षिकेचा. तुटपुंजा पगार आणि दीपकच्या अनियमित नोकरीमुळे पैश्याच्या चणचणीत, संसाराचा गाडा चालवताना तिचा जीव मेटाकुटीला आला होता. आज त्यांचा लग्नाचा वाढदिवस असल्यामुळे त्या दोघांच्या आयुष्यातील एक अनोखा दिवस होता. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे अनेक वर्षे त्यांच्या लग्नाचे वाढदिवस असेच एकमेकांसाठी काय करू? काय भेटवस्तू देऊ? अशी नुसती वचने देण्यातच गेली होती. काटकसर करत महिना रेटताना पुढील वर्षी नक्की एकमेकांसाठी काहीतरी भेटवस्तू आणून साजरा करूया असे म्हणत आनंदाने तो दिवस ते साजरा करीत असत. गेल्याच वर्षी लग्नाच्या वाढदिवशी भेटवस्तूवरून दरवर्षीप्रमाणे अशाच आणाभाका झाल्याची आठवण अलकाला झाली. घरात काम करित असताना अलकाचे मंगळसूत्र ओघवलं होतं, ते नीट जोडण्यासाठी एका सराफाच्या दुकानात ते गेले होते. त्यावेळी दुकानातील हरतऱ्हेचे दागिने बघून अलकाचे डोळे दिपून गेले होते. दागिना विकत घेण्याची कुवत नसल्यामुळे डोळे भरून पाहून आपल्याला कसा शोभला असता, एखादा दागिना नुसता हाताळणं हेच सुख मानून ती आपल्या मनाचं समाधान करून घेत होती. दागिने न्याहाळता न्याहाळता तिला एक सुंदर नाजूक, सुवर्णफूल दिसलं. तिच्या नजरेत ते एवढं भरलं की हातात घेऊन ती पुनः पुन्हा किंमत विचारून ते गोंजारित होती. दीपकने त्यावेळी हसत हसत म्हटलं होतं की, ''पुढच्या लग्नाच्या वाढदिवसाला माझ्याकडून तुला असंच सुवर्णफूल भेट देईन हा माझा वादा आहे. परंतु आता तू लवकर नीघ. तुझ्या जीवाची चाललेली घालमेल मला बघवत नाही.'' असे अनेक प्रसंग त्यांच्या आयुष्यात आले होते, परंतु कधीही, त्या दोघांनीही कुरकूर न करता संसाराचा गाडा आनंदात चालविला होता. कर्म-धर्म संयोगाने गिरगाव सारख्या परिसरात वडिलोपार्जित एका चाळीत खोली का असेना, त्यांची स्वतःची अशी वास्तू होती. जीवन सुख-दुःखाने भरलेले असले तरी नैराश्य दूर करीत त्या दोघांनीही आपल्या मनाचे स्वास्थ्य जाणीवपूर्वक जपून ठेवले होते!

दीपक खूप शिकलेला, भरदार शरीरयष्टीचा आणि निर्व्यसनी होता. परंतु परिस्थितीमुळे काबाडकष्ट करून एका कारखान्यात काम करीत जेमतेम पोटापाण्यापुरते पैसे कमवत, अलकाला समाधानी ठेवण्याचा तो नेहमी प्रयत्न करीत असे. तसेच अलका सुद्धा कधीही आर्त चेहरा न करता हसतमुखाने आलेल्या प्रसंगाला सामोरी जात संसाराचा सारीपाट चालवत असे. अलका कोकणातील. तिचे शिक्षण तिथेच झालेले होते. नारळी-पोफळीच्या वाडीमध्ये मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेली अशी ती सुसंस्कृत मुलगी होती. मध्यम बांध्याची, सावळी, नाजूक व हसतमुख असा तिचा तोंडावळा होता. तिच्याकडे अभिमानाने मिरवण्यासारखी अशी एकच गोष्ट होती ती म्हणजे घरच्या नारळबागेतील खोबरेल तेलावर जोपासलेले, निगा राखलेले, डोक्यावरील रेशमी, मुलायम, आकर्षक काळेभोर लांबसडक केस! दोघेही संसारात चिमुकल्या आशा-आकांक्षाच्या हिंदोळ्यावर तृप्त होऊन एकमेकांच्या त्यागाने दिपले होते!

अलकाचा शिरा होऊन मसालेभाताची बाकीची तयारी होईपर्यंत सात वाजले. सर्वसाधारण दीपक नऊ वाजेपर्यंत कामावरून परत येतो, हे तिला माहीत होते. परंतु आज लग्नाच्या वाढदिवशीच अलकाच्या डोक्यात, एका निराळ्या विचाराने थैमान घातले होते. त्यामुळे तिच्या कामाच्या गतीत एक, वेगळाच वेग आलेला होता. सकाळपासून तिच्या मनात घराचाच म्हणजे जे मनात घर करतं अशा दीपकचाच विचार घोळत होता.... ''पुढील लग्नाच्या वाढदिवशी आपण एकमेकांसाठी भेटवस्तू घेऊन आपला लग्नाचा वाढदिवस साजरा करूया.'' तिच्या मनात आधीपासूनच विचार घोळत होते की जर खऱ्या अर्थाने आजच्या लग्नाच्या वाढदिवशी दीपकला भेटवस्तू द्यावयाची झाल्यास दीपकने जपून ठेवलेले, आपल्या वडीलोपार्जित अतिशय दुर्मिळ असे सोन्याचे घड्याळ नुसते पडून होते. त्या घड्याळाला पट्टा नव्हता, आणि दीपकच्या मनाची तर खुणगाठच होती की ''जोपर्यंत आर्थिक परिस्थिती सुधारत नाही तोपर्यंत मी घड्याळाचा सोन्याचा पट्टा विकत घेणार नाही आणि हातात बांधून मिरवणार सुद्धा नाही!'' त्याचे ते बोल अलकाने लक्षात ठेवले होते. त्याची स्वप्नपूर्ती करण्याच्या उद्देशाने झपाटल्यागत दीपक कामावरून परत येण्याअगोदर दाराला कुलूप लावून ती तडक सोन्याचा पट्टा घेण्यासाठी बाहेर पडली होती. आज तिने मनावरच घेतले होते की, आयुष्यात अशी एकदाच भेटवस्तू द्यावी की त्याची दीपक जन्मभर याद काढेल. तिला कल्पना होती की, जरी तिच्या आवाक्यात ही गोष्ट नसली तरी डोक्यात पुढची सर्व तयारी ठेवूनच ती तडक रस्त्याला लागली. जवळपास असलेल्या केसांसाठी मॉर्डन हेअरस्टाईल, ब्युटी आर्टिस्ट व केसांचे टोप बनवणाऱ्या शॉपमध्ये तिच्या मैत्रिणीकडे गेली. तिने त्या हेअरड्रेसरला सांगितलं, ''माझ्याकडे आज वेळ फार अपुरा आहे. आणि मी जे काय सांगते ते लक्षपूर्वक ऐक. आज

मला माझे हे संपूर्ण लांबसडक केस पूर्णपणे वपन करून घ्यायचे आहेत. कारण मला तात्काळ पाच हजार रुपयांची गरज आहे.'' हे सांगतानासुद्धा तिच्या मनाचा दुबळेपणा कोलमडून ती सद्‌गदित झाली होती. तिच्या डोक्यावरचे ते लांबसडक, मुलायम, काळेभोर केस बघून, त्या मैत्रीण हेअरड्रेसरला मनातून जबरदस्त हुरहुर वाटत होती परंतु एवढ्या लांबसडक केसांच्या मोबदल्यात मिळणाऱ्या मोठ्या फायद्याचा, धंद्याच्या दृष्टीने विचार करून तिने झटपट पुढील हालचाल सुरू केली. आयती चालून आलेली संधी साधण्यासाठी, ती उतावीळ झाली आणि लगेच अर्ध्यातासातच त्या हेअरड्रेसरकडून पैसे घेऊन ती जिथे तिने पाहून ठेवलेला होता तो सुरेख सोन्याचा पट्टा घेण्यासाठी सोनाराच्या दुकानात गेली. दीपकसाठी त्याच्या घड्याळाला यथायोग्य असा सोन्याचा पट्टा खरेदी करून ती त्याच पावली लगबगीने घरी परतली.

आज दीपक लवकर घरी परतला होता. येऊन पाहतो तो अलका घरात नव्हती. त्याने आपल्या चावीने दार उघडले. आज लग्नाच्या वाढदिवशी अलकाने घर नीटनेटके सजवले होते. घरात स्वादिष्ट पदार्थांचा सुवास पसरला होता. तो एका नव्या ऊर्मीत, आनंदात होता. हळूहळू त्याच्या मनाचा चोरकप्पा उघडून, आपण सावलीसारखा संसार आनंदाने करताना आज वर्षापूर्वी दिलेल्या वचनपूर्तीची सांगता होणार ह्या समाधानाने भरलेल्या हृदयात दीपकचे ओठ हसू लागले! परंतु त्याचा तो आनंद क्षणभंगुरच ठरला. कारण काही वेळाने अलका घरात आली, तेव्हा तिचा मौलिक अलंकार म्हणजे लांबसडक केस नसलेला तिचा तो विद्रूप चेहरा पाहून दीपक एकदम गर्भगळीत झाला! त्याच्या मनाच्या दुबळेपणामुळे तिथेच कोलमडून पडला आणि त्याच्या डोळ्यातून घळाघळा पाणी ओघळून आले. म्हणाला, ''अलका हे काय केलं आहेस तू? असे अचानक तुझे हे लांबसडक केस गेले कुठे? स्वतःची अशी काय दशा करून घेतली आहेस.'' ''तू थांब थांब, असा भांबावून जाऊ नकोस. तुझ्या प्रत्येक प्रश्नाला मी उत्तर देते,'' अलका म्हणाली. दीपक हे फक्त आपल्या प्रेमासाठी आज मी माझ्या केशसंभाराचा त्याग करून, तुझ्यापुढे उभी आहे. तू सांग माझ्याजवळ अजिबात पैसे नव्हते आणि मला तर वचनपूर्ती करावयाची होती, त्यामुळे माझ्याजवळ दुसरा पर्याय नव्हता. त्यासाठी मी माझ्या भरगच्च काळ्याभोर लांबसडक केसांचा त्याग करून तुझ्या प्रेमाखातर, माझ्या इच्छेनुसार तुला घड्याळाचा सोन्याचा पट्टा आणला आहे! दीपक तू काळजी करू नकोस, माझे गेलेले केस काय परत येतील. मला कल्पना आहे, लोक मला हसतील पण तुझ्या प्रेमापुढे मला त्याची पर्वा नाही, परंतु आजचा दिवस... तिचे वाक्य पुरे होण्याआधीच दीपकला दीर्घ हुंदका आला, त्याचा जीव अनावर झाला. रडत रडतच त्याने अलकाला गच्च मिठी मारत मोठ्याने ओरडून सांगितले, ''केवढा मोठा त्याग तू आज माझ्यासाठी केला आहेस. आज मी सुद्धा तुझ्यासाठी वर्षभरापूर्वी त्या सराफाच्या दुकानात तुला आवडलेले सुवर्णफुल ह्या सुंदर भरगोस केसांवरच माळण्यासाठी आपल्या लग्नाच्या वाढदिवशी भेट म्हणून, माझे घड्याळ विकूनच आणले आहे.'' दोघांचेही डोळे पाण्याने डबडबले होते. जीवनाचं रहाटगाडगं कुणासाठी थांबत नसतं परंतु वास्तव स्विकारून खरं प्रेम मात्र सुखाच्या कल्पनेला बळ देतं.

अलकाने दीपकचा हात आपल्या हातात घेतला आणि पाणावलेले डोळे मिटून घेतले. खऱ्या औदार्याच्या साक्षात्कारात ते तृप्त होऊन एकमेकांच्या त्यागावर आधारलेल्या प्रेमाने दिपून गेले.

माधव नाडकर्णी
मो. नं. ९८१९८८४३८०

## बळीराजा



शेतकरी शेतात राब राब राबतात
त्यांना आपण कौतुकाने बळी 'राजा' म्हणतो
ऊन-पाऊस, थंडी-वारा, सकाळ-दुपार
नाही मिळत कधी किरकोळ वा हक्काची रजा
शारीरिक कष्टांना बाजारात मोल नाही ।।

काळ्या आईची सेवा कास्तकार जोडीने करतात
नोकरी करणाऱ्या जोड्या मात्र सुखात कमावतात
कास्तकाराने पिकवलेले अन्न-धान्य मिटक्या मारून खातात
बारा महिने राबूनही नाही कसली पगारवाढ
शारीरिक कष्टांना बाजारात मोल नाही ।।

सत्तर टक्के लोक शेती करतात, कसेबसे जगतात
मिळणारे फायदे-मदत अधिकारी अन् नेते हडपतात
शेतमालाला चांगला भाव मिळावा म्हणून झगडतात
अन् शेवटी नाईलाजाने आत्महत्या करतात
कारण, शारीरिक कष्टाला मोल नाही देशात ।।

अशोक बुटाला, मुंबई
७८/१६ ९८३३१४८९०४

## एक निरीक्षण

# ''सारसबाग - पुण्याचं निसर्ग वैभव''

बी. के. कुलकर्णी



पुणे शहरातील काही वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक वारसास्थळांपैकी एक म्हणजे सारसबाग. देवदेवेश्वरांचे पुत्र श्री. सिद्धीविनायक गणेशाचे सुंदर मंदिर असलेले ठिकाण. हे ठिकाण नैसर्गिक वैशिष्ट्यांनीही समृद्ध साकारलेले आहे. 'तळ्यातला गणपती' या नावानेही हे ठिकाण परिचित आहह. पूर्वी हा परिसर म्हणजे पाण्याचं तळं आणि त्यातील मातीतूनच तयार केलेलं एक छोटंसं बेट. त्या बेटावर श्री सिद्धीविनायकाचं पेशवेकालीन मंदिर. निसर्गाच्या सान्निध्यातील उंचावर असलेल्या मंदिरातील श्री गणेशाचे दर्शन मनाला प्रसन्नता देतं.

सारसबागेचा आणि लगतच्या पेशवे ऊर्जापार्कचा परिसर हा अनेक प्रकारचे वृक्ष, झुडूपे, वेली, गवत, फुलझाडे, पाणी, पाण्यातील वनस्पती, पक्षी, प्राणी यांच्या अस्तित्वाने बहरलेला आहे. सारसबागेत आपण श्रींच्या दर्शनासाठी आणि फिरावयास गेलो तर आपल्याला तेथील निसर्गवैभव दृष्टीस पडते. बागेत आणि बागेच्या आसपासच्या परिसरात वड, पिंपळ, औदुंबर, आंबा, चिंच, कडुनिंब, गुलबोहोर, अशोक, शिरीष, कांचन, बोर, सप्तपर्णी, तामण, शिंदी, माड, विलायती चिंच, चाफा, सोनचाफा, मोरपंखी, सुरू, लिची असे मोठे वृक्ष आहेत. त्याचबरोबर बागेतील भिंतीलगत विविध रानझुडूपे दिसून येतात. बागेमध्ये, बोगनवेल, अबोली, कर्दळी, झेंडू, तगर, कन्हेर, तेरडा, सोनटक्का, सदाफुली, जास्वंद, जाई, जुई आदि विविध जातींची फुलझाडे फुलवेलीही हिरवाईत विविध रंग भरत असलेले दिसतात. मंदिराभोवती असलेल्या पाण्यात नयनमनोहर पांढरी, गुलाबी कमलिनीची उमललेली फुले आपले लक्ष वेधून घेतात. पाण्यातील कारंजीही श्रींच्या दर्शनास येणाऱ्या भाविकांचं स्वागत करीत असतात.

सारसबागेचा परिसर विविध पक्ष्यांनीही गजबजलेला आहे. त्यात प्रामुख्याने आणि मोठ्या संख्येने दिसतात ते पारवे. पारव्यांबरोबरच चिमण्या, कावळे, डोमकावळे, साळुंकी, पाणकावळे, गायबगळे, ढोकरी, लालबगळा, राखी धनेश, खंड्या, दयाळ, कोकिळ, कुलबुल, शिंपी, राखीवटवट्या, रात्रिचंट बगळा इत्यादि पक्षी दृष्टीसुख देतात. बागेतील पाण्यामध्ये मासे, कासव तसेच पांढऱ्या छातीची पाणकोंबडी, धनवर या पक्ष्यांचेही दर्शन होऊ शकते. उंच झाडांवर वटवाघुळे लटकलेली दिसतात. ६ जुलै २०१४ रेजी सकाळी बागेत फिरत असताना धनवर (Spot filled Duck) पक्षी त्याच्या सहा पिलांबरोबर पाण्यात विहार करताना दिसला. सहा पिले एका रांगेत आईपाठोपाठ जाताना दिसणारे अकल्पित दृष्य म्हणजे एक आनंदाची आठवण. त्याचबरोबर पांढऱ्या छातीची पाणकोंबडी तिच्या दोन पिलांबरोबर खाद्य शोधित भटकताना दिसत होती. परिसरात खारींचंही दर्शन होते. आवाजावरून तिचं अस्तित्वही जाणवतं. घूस, उंदीर, या प्राण्यांचाही वावर परिसरात आढळून येतो. एखाद्या ठिकाणची जैवविविधता चांगली आहे, समृद्ध आहे याचा निकष म्हणजे त्या परिसरात जर प्राणी-पक्ष्यांची पिल्ले दिसली तर तो परिसर जैवविविधतेने समृद्ध आहेहे ओळखायचे. जीवासाठीच्या खाद्याची उपलब्धता असेल तर तो परिसर नैसर्गिक सहजीवनाचं दर्शन घडवतो!

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने सारसबागेचा परिसर हिरवळीने नटवलेला, स्वच्छ, सुंदर ठेवलेला आहे. आपणही हा परिसर कचरामुक्त स्वच्छ ठेवऱ्याचं कर्तव्य अंगी बाणवू या! सुप्रभाती फिरावयास येणाऱ्या पुणेकरांना श्रींच्या दर्शनाबरोबरच प्रसन्न निसर्गाच्या सान्निध्यात, प्रदूषणमुक्त वातावरणात, शरीराला आणि मनाला चैतन्याचा लाभ होतो. सुप्रभातीच्या भूपाळ्यांचा, भक्तीगीतांचा सुमधूर संगीताने परिसर भारलेला असतो. आपलं जगणं उत्साही, आनंदी होतं! संत तुकारामांच्या अभंगाची अनुभूती येते ती अशी-

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी। पक्षीही सुस्वरे आळविती।।'

कोणे एके काळी 'सारस' पक्ष्याच्या अस्तित्वाने समृद्ध असलेला हा परिसर त्या डौलदार पक्ष्याची स्मृती जपत 'सारसबाग' या नावाने पुण्याचं निसर्गवैभव टिकवून आहे. 'प्रसन्न सकाळ' अनुभवायची असेल तर 'सारसबाग' हे उत्तम स्थळ आहे. सारसबागेतील निसर्ग सहवासाच्या उपवनातील देवाचं मंदिर म्हणजे शांतता आणि समाधानाचा ठेवा आहे!

बी. के. कुलकर्णी, पुणे, मो.९८२२४६५४१०

स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या अनेक यशस्वी गृहप्रकल्पांनंतर

## ***मे. सुरेश घंगाळे आणि सहकारी***

सादर करीत आहेत

## तालुका वेल्हे (मिनी महाबळेश्वर) तोरणा आणि राजगड (जिल्हा पुणे) किल्ल्यांच्या सान्निध्यात

११ गुंठ्यांपासून पुढे फार्म हाऊस प्लॉट

***स्टेट बँक कर्मचाऱ्यांना व त्यांच्या नातेवाईकांना***

***स्पेशल १० टक्के डिस्काउंट***

**फार्म हाऊसची वैशिष्ट्ये**

२० गुंठे प्लॉट दोन जणांमध्ये किंवा अधिक जणांमध्ये घेण्याची सोय

१२ महिने निसर्गरम्य परिसर, भरपूर पाऊस

***दसरा-दिवाळी निमित्त स्पेशल डिस्काउंट***

**खरेदीखताचेवेळी - ५०% व**

**उर्वरित रक्कम समान ५ मासिक हप्त्यात**

**************

*** १/२ बेडरूमचे फ्लॅटस् बुकिंगमध्ये उपलब्ध ***

**खराडी येथे (नगर रोडला लागून)**

**************


**संपर्क - ७५०७८०६००७**

**ऑफिस : स.नं. ९१/१, स्टेट बँक कॉलनी, 'रायगड' बिल्डिंग.**

**उत्सव हॉलजवळ, पौड रोड, कोथरूड, पुणे - ४११०३८**

**वेळ - संध्याकाळी ५ ते ७**

**शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवशी - सकाळी ११ ते १**


State Bank of India
THE BANKER TO EVERY INDIAN
What do you call a loan
that helps send a child back to school?
That helps a deprived woman
earn a living and self-respect?
That assures an old man,
he will not be abandoned again?
And ensures that an amputee can
stand tall once more?
What would you call a loan
that is not just taken, but gives back
so much more in return?
HOPE LOANS
SBI HOME LOAN
SBI CAR LOAN
- Lowest interest rates
- No processing fee*
This festive season, SBI is happy to introduce Hope Loans - an initiative dedicated to ushering in change and a whole lot of cheer. For every loan we disburse during the festive season, SBI will contribute a sum to partner NGOs working in the fields of education, health, community welfare and environment, among others. So the next time you avail a loan from us, you are not only fulfilling your dreams but also giving hope to many more.
To make a difference log on to
www.sbi.co.in/hopeloans
Personal Loan, Education Loan and transactions through Buddy App are also covered under the initiative.
Download Buddy and avail festive offers.
For assistance call 1800 425 3800 & 1800 112 211 (Toll Free) 080 26599990
Follow us on:
*Conditions apply

OCTOBER 2016 SAMVAD

## *Snapshots of the Annual General Meeting held at Pune on 22nd August 2016*



Shri. M. G. Ranade from Nashik, being felicitated at the hands of Shri. S. B. Gokhale, with 'Late Shri Vasudeo V. Gandhe and Late Smt. Umabai V. Gandhe Puraskar'




Shri. Mohinder Singh Sahwney, President, Nagpur Z.S.C. enlightening the gathering about Shri. C. N. Vazirani's dedication to the Association



Shri. C.N. Vazirani being felicitated with 'Late Shri. L.N.Pabalkar 'Gold Medal' and 'Scroll of Honour' by Shri. S. B. Gokhale




Shri. S. B. Gokhale, Circle President, addressing the audience




Shri. D. A. Kulkarni, Circle Treasurer, presenting the Financial Statements in the A.G.M. for approval



Shri. Pramod Chate and Sau Aparna Chate being felicitated by Shri. S. B. Gokhale for the dedicated work of sending Birth Day Greetings

OCTOBER 2016 SAMVAD

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/61/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2014-2016
Licence to Post without Prepayment No.WPP - 22 at Market Yard P.S.O. on 25th of each Month
and published on 25th of the month



Shri. Somnath Dixit being felicitated by
Shri. S. B. Gokhale for enrolling
100% membership in Dhule




Sarvashri V. V. Mukim, Vilas Gandhe,
S. B. Gokhale and D. A. Kulkarni,
the newly elected Circle Office Bearers

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ३ ते ५.३० या वेळात उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address** : A/5, Swami Siddharth C.H.S. Ltd., S. V. Road, Naupada, Thane 400 602. **Tel. No** : 022-25446837
**Timings** : On Tuesday & Friday between 4 pm and 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030.Ph:020-24332141**

To,

**Publisher** – Shri. Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri. Shailendra Borkar, Director : Sanwad Tradeprints Pvt. Ltd., B/7, Gowalkar Building, 595, Shaniwar Peth, Pune 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.